## प्रकरण - १

# मराठी ग्रामीण कादंबरी व प्रादेशिकता

## प्रकरण - १ ले

# मराठी ग्रामीण कादंबरी व प्रादेशिकता

१.१ प्रस्तावना

१.२ कादंबरी संकल्पना

१.३ कादंबरीचे घटक

१.४ कादंबरीचे प्रकार

१.५ मराठी ग्रामीण कादंबरी संकल्पना

१.६ ग्रामीण नागर भेद

१.७ ग्रामीण कादंबरी परंपरा

१.८ प्रादेशिक कादंबरी संकल्पना

१.९ प्रादेशिक कादंबरीचे विशेष

१.१० समारोप

# प्रकरण - १ ले

# मराठी ग्रामीण कादंबरी व प्रादेशिकता

## १.१ प्रस्तावना :-

कादंबरी या वाङ्मय प्रकाराची सुरुवात अव्वल इंग्रजी कालखंडात म्हणजेच सुमारे १५० वर्षापूर्वी झाली. निरनिराळ्या देशी भाषातील कादंबरीस स्फूर्ती इंग्रजी वाङ्मयाच्या परिचयानेच मिळाली. इंग्रजी राजवटीचा साहित्यावरही परिणाम झाला आणि त्यातूनच मराठी कादंबरीचा जन्म झाला. कादंबरी वाङ्मयाची सुरुवात झाली परंतु तिचा विकास पाहिजे तेवढा झाला नाही. सुरुवातीचा कादंबरीचा प्रवास फारच खडतर होता.

मराठीतील पहिली कादंबरी म्हणून 'हरी केशवजी' यांची 'यांत्रिकक्रमण' या कादंबरीकडे पाहिले जाते. कादंबरीच्या व्यवच्छेदक लक्षणावरुन बापट व गोडबोले हा मान 'बाब पद्मनजी' यांच्या 'यमुना पर्यटन' (इ. स. १८५७) ला देतात. 'मराठी कथा वाङ्मय' या लेखात वि. का. राजवाडे हा मान 'मुक्तामाला' (१८६१) या कादंबरीला देतात.

भालचंद्र नेमाडे यांनी कादंबरीविषयी म्हटले आहे की, "आशयानुसार शैली भाषेच्या माध्यमातून विविध तंत्रांनी रूपाची मांडणी करते. 'यमुना पर्यटन' अशी कृती दिसते."[१] बाबा पद्मनजी यांनी आपल्या कादंबरीमध्ये महाराष्ट्रातील ब्राह्मण विधवांच्या शोचनीय करूण स्थितीचे चित्रण केलेले आहे.

" 'बाणभट्टाची' 'कांदबरी' किंवा 'सुबन्धुची' 'वासवदत्ता' यांचा मात्र विशेष उल्लेख केला पाहिजे कारण आपल्या कादंबरी वाङ्मय प्रकाराचे विशिष्ट तंत्र जरी त्यांच्यामध्ये आढळले नसले तरी कादंबरी लेखनाचे पहिले प्रयत्न या दृष्टीने यांचे कादंबरीच्या विकसनात महत्त्वाचे स्थान आहे. प्रणयप्रधान दृश्ये, चित्ताकर्षक कथानक व ललित मधूर भाषाशैली हे यामधील गुण वाखाणण्यासारखे आहेत."[२] असे या कादंबरीविषयी बापट व गोडबोले यांनी म्हटलेले आहे. याशिवाय म. वि. रहाळकर यांनी 'नारायणराव व गोदावरी' ही कादंबरी लिहिली.

१९४० पर्यंतची कादंबरी प्रेरणाभिन्नतेतून आकारास आली. भालेकर, साने गुरुजी यांच्या लेखन प्रेरणा वेगळ्या असल्या तरी वास्तवाची ओढ ही कादंबरीची प्रकृती दिसून येते. "१९३९ च्या डिसेंबर मध्ये र. वा. दिघ्यांची 'पाणकळा' प्रसिद्ध झाली आणि मराठी कादंबरीत पहिल्यांदाच मराठी मातीचा गंध दरवळल्याचा अनुभव मराठी वाचकाला आला."[३] इतकी ही कादंबरी वाचकांना सुखद अनुभव देणारी व प्रादेशिक वास्तवता रेखाटणारी होती.

कादंबरी हे मराठी साहित्याचे समृद्ध दालन आहे. मराठी कादंबरीने आजच्या युगात अफाट लोकप्रियता मिळविलेली आहे. मराठी कादंबरीतील ग्रामीण प्रादेशिक कादंबरीने तर फारच क्रांती केलेली आहे. तिने जीवन शोधाची वाटचाल केलेली आहे. कादंबरीच्या समृद्धतेविषयी अंदाज बांधणे फारच कठीण आहे.

कादंबरीत व्यक्तिरेखांचा व एका विस्तृत आकर्षक कथानकाद्वारे जीवनविषयक सखोल तत्त्वज्ञान घडविणे हा कादंबरीचा मुख्य हेतू असून हेच स्वरूपही आहे. कादंबरीत व्यक्ती जीवनदर्शनाला स्थान असते. मग ते पात्र स्त्री असो अथवा पुरुष. कादंबरीत सर्व काही घडत असते ते पात्रांमुळेच आणि पात्रांच्याच अस्तित्वासाठी घडत असते. व्यक्तिरेखांशिवाय कादंबरीला संसार चित्रण म्हणता येणार नाही. कादंबरीतील पात्रे कल्पनेने अवतरलेली असतात. त्यातून कथानक आकाराला येत असते. कादंबरी प्रकारात लेखकाची विशिष्ट जीवनदृष्टी व्यक्त होत असते. कादंबरीकाराच्या विशिष्ट दृष्टिकोणाचा प्रभाव त्याच्या लेखनावर पडत असतो. स्वत:चे अनुभव, विचार, संस्कार, जीवनदर्शन हे प्रदर्शित करण्याची इच्छा असते त्यातून कादंबरी आकारास येते.

कादंबरीच्या आशयासंबंधी व तिच्या रचनाप्रकाराविषयी तिच्यातील विविध घटकाविषयी विस्तृत विवेचन करून अनेक विद्वानांनी कादंबरीच्या व्याख्या केलेल्या आहेत.

## १.२ कादंबरी म्हणजे काय ?

१. Novel या शब्दासाठी 'नावल' हा शब्द योजून का. बा. मराठे यांनी 'नावल व नाटक याविषयी निबंध १८७२ मध्ये लिहिला. नावल म्हणजे चमत्कारित व आश्चर्यकारक गोष्टी ज्यात फार असतात व सुरुवातीपासून अखेरपर्यंत वाचण्यास जागोजागी नवल वाटावे. अशा प्रकारचा जो ग्रंथ त्यास इंग्रजीत नावल ही संज्ञा आहे.

२. मराठी विश्वकोश खंड - ३ - एक दीर्घ कथात्मक गद्य साहित्य प्रकार इंग्रजी 'नॉवेल' या संज्ञेस 'कादंबरी' हा मराठी पर्याय असून तो बाणभट्टाच्या 'कादंबरी' या संस्कृत कथात्मक ग्रंथनामावरून मराठीत रूढ झाला. मराठी भाषेचा कोश (१९२९) यात कादंबरी या संज्ञेचा अर्थ १. निर्मूल कथा रचून कवीने केलेले काव्य २. कल्पितकथा. [४]

३. M. Abble Chevelley या फ्रेंच लेखकाच्या मते कादंबरी म्हणजे जिला काही विस्तार आहे अशी गद्य कल्पित कथा होय.

४. ना. सी. फडके - एखाद्या व्यक्तीची विशिष्ट इच्छा अनेक अडचणीतून आणि संकटातून मार्ग काढून कशी सिद्धीस गेली अगर तिची कशी मोडतोड झाली याची कहाणी म्हणजे कादंबरी होय.[५]

५. मनोविश्लेषणास प्राधान्य देणारे टीकाकार यांच्या मते हृदयान्तरंगाचे आविष्करण अथवा मानवी हृदयाच्या सूक्ष्म कलात्मक अभ्यास किंवा आकर्षक कथानक हाच कादंबरीचा आवश्यक घटक होय.

६. एच. जी. वेल्स - ज्यात सर्व काही सामावेल अशी गारूड्याची जादूची कांडी (थैली) होय.

७. चंद्रकांत बांदिवडेकर - कादंबरी हा इतका लवचिक प्रसरणशील आणि सर्व समावेशक वाङ्मयप्रकार आहे की, त्याचे स्वरूप सांगता आले तरी तिच्या व्यवच्छेदक लक्षणांनी त्याच्या सीमारेषा निश्चित करणे कठीण आहे.[६]

अशा विविध प्रकारच्या व्याख्या असल्या तरी त्या व्याख्या स्वत:ला अभिप्रेत असलेल्या अंगावरच अधिक प्रभाव टाकतात. पण परिपूर्ण व्याख्या कोणीच करू शकत नाही. परंतु बापट व गोडबोले यांनी केलेली व्याख्या परिपूर्ण वाटते. ती अशी, ''सत्य सृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्‌वलंबित जीवित घटना यांचे गोष्टी रूपाने वर्णन करून कलानंदाची प्राप्ती करून जीवनातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मय विभाग होय.[७] यामध्ये कादंबरीच्या सर्व घटकांचा समावेश होतो.

आजची कादंबरी ही कथेतून विकसित झाली आहे. दीर्घकथा म्हणजेच कादंबरी होय. असा दृष्टिकोण स्वीकारला तर एका गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तो म्हणजे कादंबरी व कथा या दोन्ही गोष्टी स्वरुपत: पूर्णपणे भिन्न आहेत. कादंबरीत संसार चित्र असते. भिन्न आशयासूत्रे तीमध्ये एकजिनसी स्वरुपात गुंतलेली असतात. अवघ्या जीवनाचे प्रतिबिंब तिच्यामध्ये उमटलेले असते. साधारणपणे तिचे स्वरुप महाकाव्य सदृश्य बहुआयामी असते. अनेक पात्रे, प्रसंग, घटना, वातावरण, स्थलनिर्देश यांनी ती खचाखच भरलेली असते. म्हणून कादंबरीला गद्य महाकाव्य हे वर्णन शोभण्यासारखे आहे. अशी कादंबरी ही मराठी वाचकांच्या मनाचा ठाव घेणारी अंत:करणाला जाऊन भिडणारी आहे.

## १.३ कादंबरीचे घटक :-

कोणताही लेखक कादंबरी लेहिताना विशिष्ट घटक डोळ्यांसमोर ठेऊन कथानक लिहित असतो. सामाजिक वास्तव व वाङ्मयीन गुणवत्ता यांच्या परस्पर संबंधाचा शोध घेण्यासाठी कादंबरी लेखन होत असते. त्यातून व्यक्त होणाऱ्या अनेक अंगांचा विचार करणे अपरिहार्य ठरते. प्रादेशिक कादंबरीतून आविष्कृत होणारी सामाजिकता व जीवनानुभव विचारात घेऊन वेगवेगळ्या प्रदेशातील कादंबरीकारांनी आपल्या कथानकाचे विश्लेषण करण्यासाठी काही ठराविक घटक घेतले. त्या घटकांच्या आधारे कादंबरी लिहित गेलेले आहेत.

लेखकाला आलेल्या अनुभवांना काल्पनिकतेची जोड देऊन कांदबरी लेखन केलेले असते. योग्य अनुभवांची निवड अनुभवावर योग्य संस्कार करून त्यातून कादंबरी आकार घेत असते. संस्काराशिवाय आस्था, जीवनाचे कंगोरे चौकसपणे धुंडाळणे, तत्त्वाचा व अद्‌भुताचा मार्ग धरून मूलत: मानवी प्रश्नाचा विचार वा कल्पना हा कादंबरीचा मूळ आधार आहे. मुख्य सामग्री ही वृत्ती व दृष्टिकोण, अनुभव व कल्पना, जिवंत व्यक्तिचित्रणाचे एक विस्तृत आकर्षक कथानक कादंबरीत येते.

**१.३.१ विषय :-** कादंबरीचा विषय हा प्रधान असला पाहिजे. लेखक प्रथम कादंबरीचा विषय निवडत असतो. सामाजिक जीवनात वेगवेगळे अनुभव लेखकाला येत असतात. त्यातील मनाला भावलेला आणि ज्यातून समाजाला काहीतरी बोध होईल असा विषय लेखक निवडतो. आणि आपल्या कल्पनेच्या आधारे त्या विषयाला तो विशिष्ट प्रकारची कल्पकता देतो. त्यातून विस्तृत अशी कादंबरी अवतरली जाते.

कादंबरीच्या विषयातून लेखक हा लोकसंस्कृतीवर संस्कार करून ती कालबाह्य न होता लोकांनी तिचा स्वीकार करावा अशा प्रयोजनातून कादंबरीचा विषय निवडतो.

**१.३.२ कथानक :-** जीवन हे कलेप्रमाणेच सलग अखंड व गतिमान चालू आहे. या जीवनामध्ये सर्जक वर्गाला आलेले अनुभव वाचक वर्गाला संस्कार करून देत असतो. लेखकाचे तंत्र, कल्पकता, विशाल बुद्धी वगैरे बाबी त्यातून सहजगत्या प्रतित झाल्या पाहिजेत. अशा प्रकारचे कादंबरीचे कथानक असले पाहिजे.

कथानकाबद्दल बांदिवडेकर म्हणतात - "समाजजीवनातील व व्यक्तिजीवनातील वास्तव कादंबरीत कधी आत्माविष्कार, कधी उद्‌बोधनवादी रूपात, कधी प्रचारात्मक दृष्टीने कधी वस्तुस्थितीने प्रतिबिंब समाजापुढे ठेवण्याच्या दृष्टीने व्यक्त होऊ लागले."[८]

जगात जे व्यक्तीचे संबंध लेखक पहातो, त्यांची एकमेकांशी जुळणी झाली म्हणजे कथानक तयार होते. एखाद्या मनुष्याचा आयुष्यक्रम कादंबऱ्या सांगतात. त्यामध्ये कथानक व त्याची गुंतागुंत बरीच झालेली असते. कादंबरीच्या कथानकाचा पट बहुधा व्यापक असतो. प्रादेशिक कादंबरीत ग्रामसमुह केंद्रस्थानी ठेवुन संपूर्ण कथानक हे विखुरलेले असते. कथानक हे समूहमनाचे किंवा जीवनाचे चित्रण करते.

**१.३.३ पात्रे किंवा व्यक्तिचित्रणे :-** व्यक्ती समूह कथा आज कादंबरीतून सांगितली जात आहे. विभिन्न स्वभावाच्या पात्रांच्या माध्यमातून कादंबरीकार जीवन चित्रण करीत असतो. म्हणून पात्र किंवा व्यक्तिचित्रण हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक असतो. पात्रे म्हणजे लेखकास भावलेली समाज जीवनातील व्यक्ती असते. त्यांचा स्वभाव, वृत्ती, प्रवृत्ती, वर्तन यामध्ये कथानकाचे धागे गुंफत गेलेले असते. ही पात्रे लेखकाच्या हातातील कळसूत्री बाहुल्या असतात. ती लेखकाच्या मर्जीप्रमाणे वागत असतात. पात्रे मानवी स्वभावाचा नमुना म्हणून चिरंतन अविस्मरणीय ठरतात. 'धग' मधील 'कौतिक' 'बनगरवाडी' मधील 'मास्तर' व्यक्तिरेखा लक्षात राहिली नाही असे म्हणणारा वाचक दुर्मिळच.

**१.३.४ संवाद :-** कादंबरीमध्ये विविध पात्रे आपआपसात बोलत असतात. आपल्या मनातील इच्छा-आकांक्षा दुसऱ्याला सांगत असतात. त्यावेळी त्यांच्यामध्ये संवाद साधला जातो. वास्तविक पहाता संवाद हे नाटकाचे प्रमुख अंग आहे. परंतु त्याचा वापर कादंबरीमध्येही होऊ लागला आहे.

उषा हस्तक याविषयी म्हणतात, ''व्यक्तीच्या गरजांमुळे सभोवतालच्या जगाशी ज्याचे अपरिहार्य संबंध निर्माण होतात. व्यक्तीचे अनुभवविश्व संवादातून साकार होत असते. या संबंधामागचे हेतू व स्वरूप विविध असतात. या सर्व संबंधांना जोडण्याचे प्रयोजन आणि मानवी हेतू व्यक्त करण्याचे सुलभ व प्रभावी माध्यम म्हणजे संवाद होय. हे संवाद मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे.''[१] परिपूर्ण व अर्थपूर्ण संवाद कादंबरीची रंजकता वाढवितात. संवाद हे अलंकार व बोजड भाषेपासून दूर असावेत. संवादातून कादंबरीचे कथानक सहज व्यक्त होत जावे लागते. नैसर्गिक संवाद ही मोठी शक्ती कादंबरीला मोठेपण देते.

**१.३.५ निवेदन पद्धती :-** निवेदन पद्धती व संवाद यांची सांधेजोड जर व्यवस्थित असेल तर कादंबरी अधिक प्रभावी ठरते. लेखकाने प्रामुख्याने तृतीय पुरुषी एकवचनी निवेदन वापरणे योग्य आहे. परंतु काही अपवादाच्या ठिकाणी प्रथम पुरुष एकवचनी योग्य ठरते. लेखक आशयाच्या गरजेनुसार या पद्धतीचा वापर करतो. आवश्यक तेथे निवेदन व संवाद यांचा वापर केल्यास कादंबरीचे यश वाढते.

**१.३.६ वातावरण निर्मिती :-** कादंबरीचे कथानक ज्या परिसरामध्ये घडते तेथील निसर्ग, प्राणी, प्रदेश यांचे यथायोग्य दर्शन कादंबरीतून शब्दांच्या माध्यमातून साकार करावे लागते. प्रादेशिक कादंबरीमध्ये पात्रांच्या अभिव्यक्तीपेक्षा वातावरण निर्मितीवर अधिक लक्ष केंद्रित करावे लागते. वातावरण हे प्रसंगानुरूप तयार करता आले पाहिजे. पात्राला आणि कथानकाला वातावरणामध्ये समाविष्ट करता आले पाहिजे.

**१.३.७ भाषा :-** भाषा हे विचार व्यक्त करण्याचे माध्यम आहे. आणि भाषेच्या माध्यमातून साहित्य अवतरत असते. भाषा कादंबरीचा प्रमुख घटक आहे. लेखकाचे विषयाबाबतचे आकलन, त्याची भूमिका, दृष्टिकोण यांच्याशी भाषा सुसंगत असावी. पांडित्य दर्शनासाठी वापरलेली भाषा कादंबरीच्या यशाला मारक ठरते. प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये प्रादेशिक वातावरण निर्मितीसाठी व सामाजिकतेचा यथायोग्य प्रत्यय यावा म्हणून बोलीभाषेची योजना केलेली असते. भाषेतील शब्दांचा, विशिष्ट मानसिकतेला अनुलक्षुन भाषेचा वापर केल्याने प्रादेशिक लोकजीवन समजते.

**१.३.८ संघर्ष :-** फडके यांनी कादंबरीमध्ये दोन प्रवत्तींचा संघर्ष दाखवला आहे. खांडेकरांनी दोन मनांचा संघर्ष स्थूलपणाने रेखाटला आहे. कोणतीही कादंबरी संघर्षाशिवाय असू शकत नाही. संघर्ष हा कादंबरीचा आत्मा असतो. हे संघर्ष स्वार्थ व परार्थ, प्रेम व इर्षा, भोग व त्याग, क्रोध व नम्रता, आपुलकी व द्वेष, वासनात्मक प्रेम व विशुद्ध प्रेम, हिंसा व अहिंसा या बाबतीत असू शकतात.

**१.३.९ उपकथानक :-** कादंबरी जीवनातील अपरंपार वैविध्य जटीलपणा आटोपशिरपणा दाखविण्यासाठी उपकथानकांचा वापर केला जातो. केतकरांनी उपकथानकाच्या आधारे वेगवेगळे अनुभव व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. उपकथानकाद्वारे नायकाबद्दलचे विचार आणि स्वभावचित्रण उपकथानकातून केलेले पहावयास मिळते. हे तसेच ते कथानकात रेखीवपणा आणण्यास मदत करते. उपकथानकातून मुख्य कथानकास चांगला उठाव मिळतो. कथानकाची परिणामकारकता वाढते.

## १.४ कादंबरीचे प्रकार :-

कादंबरीतील कथानक कोणत्या संदर्भात आहे, ते कोणत्या विषयाला अनुसरुन वाचकांचे मनोरंजन करते यानुसार कादंबरीचे विविध प्रकार पहावयास मिळतात.

**१.४.१. भाषांतरित कादंबरी :-** "१८१८ ला पेशवाईचा अस्त झाला. इंग्रजी अंमल भारतावर सुरु झाला. इंग्रजी अमलाचा प्रभाव साहित्यावरही पडला. इंग्रजी भाषेतील कादंबऱ्यांची व भिन्न भाषेतील कादंबऱ्यांची रूपांतर मराठीत होऊ लागली. ही कादंबऱ्यांच्या क्षेत्रातील एक वेगळी पण बरीच रूळलेले

वाट म्हणता येईल. ''[१०] असे भाषांतरीत कादंबरी विषयी कुसुमावती देशपांडे म्हणतात.

१८०६ ला 'इसापनीतिचे' बालबोध मुक्तावली असे भाषांतर करण्यात आले. 'पिलीग्रिम प्रोग्रेस' या इंग्रजी कादंबरीचे हरिकेशवजी यांनी 'यांत्रिक क्रमण' असे भाषांतर केले. सुरुवातीच्या अशा बऱ्याच कादंबऱ्यांचे भाषांतर मराठी झाले.

**१.४.२. ऐतिहासिक कादंबरी :-** ऐतिहासिक सत्याचा अभास निर्माण करून ऐतिहासिक घटनांवर आधारित ऐतिहासिक कादंबऱ्यांची निर्मिती केली जाते. ऐतिहासिक कथानक व खोल मानवी भावनांची तळमळ यांची चित्तवेधक जुळणी असते. अद्भुत आणि वास्तव यांचा दुवा ऐतिहासिक कादंबरीतून साधता येतो. हरि नारायण आपटे यांनी विपुल प्रमाणात ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. गुंजीकरांनी १८१७ मध्ये लिहिली. तर नागेश बापट यांनी 'चितुर गडाचा वेढा' ही प्रसिद्ध ऐतिहासिक कादंबरी लिहिली. नाथ माधव यांनी शिवकालीन कमी ज्ञात असलेली बाजू लोकांना ज्ञात करून देण्यासाठी 'स्वराज्यमाला' हे ऐतिहासिक कादंबरीचे सत्र आरंभले.

**१.४.३. राजकीय कादंबऱ्या :-** आजची राजकीय कादंबरी उद्याचा इतिहास ठरेल या भावनेपोटी कादंबरीकार लेखन करतात. राजकीय कादंबरी तत्वचर्चात्मक कादंबरी यांच्या सीमारेषा निश्चित करणे अवघड असते. काटेकोर बोलणे शक्य नसते. भा. वि. वरेरकर यांनी 'झुलता मनोरा' ही कादंबरी लिहिली. ना. सी. फडके यांनी 'कुलाब्याची दांडी' तर गाडगीळांनी 'दुर्दम्य' यासारख्या कादंबऱ्यांची निर्मिती केली.

**१.४.४ सामाजिक कादंबऱ्या :-** भारतीय समाजामध्ये विविध सामाजिक समस्या असतात. त्या समस्यांचे चित्रिकरण कादंबरीकारांनी केलेले आहे. विविध चाली, रीती, परंपरा, अंधश्रद्धा, धार्मिकता, अज्ञान, अस्पृश्यता, शिक्षण, स्त्री शिक्षण, विधवा, बालविवाह, केशवपन, स्त्रियांची दु:खपूर्ण स्थिती आणि सोशिक समाज या विषयावर कादंबरी लेखन झाले. त्यांना सामाजिक कादंबऱ्या असे म्हणतात. वरील विषय कादंबरीकाराच्या जिव्हाळ्याचे विषय आहेत. द्वेष आणि उपरोध यांनी भरलेल्या या कादंबऱ्या असतात. इंग्रजी शासनाने समाजातील दोष दिसू लागले. ते दूर करण्यासाठी ऐतिहासिकतेतून वास्तवाकडे जाऊन आपला धर्म व रूढी तपासून पहावे असे लेखकांना वाटले व त्यातून सामाजिक कादंबऱ्यांची निर्मिती झाली.

पहिल्या सामाजिक कादंबरीचा मान 'यमुना पर्यटन' या बाबा पद्मनजी यांच्या कादंबरीला मिळतो. विनायक दामले यांनी 'अवलिया' ही कादंबरी लिहिली. अशा विविध सामाजिक विषयावर विपुल कादंबऱ्या निर्माण झाल्या आहेत.

**१.४.५. अद्भुतरम्य कादंबरी :-** भाषांतरीत कादंबऱ्यांच्या पाऊलवाटेने अव्वल इंग्रजी सांस्कृतिक विकासाबाबत मराठी समाजाला पुन्हा बाल्यावस्था प्राप्त झाली. पहिली प्रवृत्ती अनुकरणाची आणि त्यानंतर महाराष्ट्राची एकंदर राजकीय परिस्थिती अद्भुत अभिरुचीला अनुकूल होती. पारतंत्र पराभूत मनोवृत्ती पराक्रमाची प्रवृत्ती भावलेली मने पेशवाईतील थिल्लर विलासी वृत्ती अशा आळशी मनोवृत्तीतून अद्भुताकडे आकर्षित झाली. कर्तबगारीला आवकाश नव्हता. स्वप्नाळू व विलासी वृत्तीला भरपूर वाव होता. मिळमिळित जीवनात काल्पनिक कथांच्या आश्रयाने अद्भुताचा अंश यातूनच अद्भुतरम्य कादंबरीची मागणी होऊ लागली.

लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' ही कादंबरी अद्भुतरम्य आहे. याशिवाय 'रत्नप्रभा' ही कादंबरी सुद्धा अद्भुतरम्यच आहे.

## १.५ मराठी कादंबरी संकल्पना

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण साहित्यात महत्त्वाची भर पडली. ग्रामीण साहित्य हे आधुनिक साहित्यात मोडते. १९२० ते १९७० हा काळ ग्रामीण साहित्याच्या दृष्टिने, राजकीय, सामाजिक दृष्ट्या प्रबोधनाचा काळ होता. या काळानंतर मराठी साहित्य विविध प्रकार साकारू लागले. एका सामाजिक वास्तवाचे भान मराठी साहित्याला पर्यायाने मराठी कादंबरीला लाभले. या प्रेरणेतूनच १९४० पासून विपुल प्रमाणात साहित्य निर्मिती होऊ लागली. या काळातील साहित्यिक वर्ग पांढरपेशी, बुद्धिजीवी, शिक्षित व नागर होता. विविष्ट वर्गातील लोकांची सुख-दु:खे व त्यांचे प्रश्न हाताळले. या काळात समाजसुधारणेच्या चळवळी झाल्या. त्याचे पडसाद साहित्यावर उमटले गेले. त्यातून मात्र उच्च वर्गीयांचे जीवन चित्रण झाले. पण ग्रामीण जीवन चित्रण झाले नाही. ग्रामीण वास्तवातून साकार होणारे आणि ग्रामीण जीवनानुभवातून फूलणारे साहित्य विशिष्ट समाज निर्माण करू लागला.

१९ व्या शतकाच्या शेवटी काव्य, नाटक, कादंबरी, कथा या साहित्याची निर्मिती होऊ लागली. या काळात साहित्यिक वर्ग पांढरपेशी, बुद्धिजीवी, शिक्षित, नागर होता. त्यांनी निर्माण केलेले साहित्य हे पांढरपेशी व नागर जीवनाचे चित्रण करणारे होते. विशिष्ट वर्गातील लोकांच्या जीवनाला जळवा सारख्या चिकटलेल्या परंपरागत चालीरिती व संकेत, परंपरांवर त्यांनी प्रकाश टाकला नाही. उच्च वर्गाचे व वास्तव जीवन समाज सुधारणेच्या अनुषंगाने चित्रित झाले. अनागर जीवनाकडे साहित्यिक वर्गाचे लक्ष गेले नाही. त्यांनी आपल्याच पांढरपेशी जीवनाच्या रिंगणात साहित्याची निर्मिती केलेली दिसते. १९०५ पासून ग्रामीण जीवन चित्रण करण्यास विविध लेखकांनी सुरुवात केली.

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. भाषेच्या माध्यमातून साहित्य अवतरत असते किंवा त्याचा प्रसार होत असतो. साहित्य हे प्रसाराचे माध्यम नसले तरी साहित्यातून आपोआप ग्रामीण संस्कृती संवर्धनाचा प्रसार होतच असतो. काही प्रमाणात का असेना ग्रामीण साहित्य हे संस्कृतीच्या भरण-पोषणाचा आलेख मांडत असते. सामाजिकता, संस्कृती संवर्धन ही साहित्याची मूल्ये ठरू शकत नाही. म्हणून काही साहित्याचा मानवी संस्कृतीशी अजिबात संबंध येत नाही असे म्हणता येणार नाही. यासाठी साहित्य ही एक सांस्कृतिक घटना आहे. हे मत यथायोग्य मानावे लागते. मराठी ग्रामीण कादंबरीचा विचार करताना वरील मतास प्राधान्य द्यावे लागते.

## १.५ ग्रामीण कादंबरी संकल्पना

ग्रामीण साहित्याचा प्रवाह सामर्थ्यवान प्रवाह झाला आहे. ग्रामीण साहित्य धारा मराठी वाचकांना आता अपरिचित राहिलेली नाही. ग्रामीण साहित्य सामाजिक जाणिवेची भाषा बोलू लागले आहे. आपल्या सभोवतालच्या जीवनातून काही घटक वेचून घेऊन कादंबरी आकार घेत असते.

**१. आनंद यादव** :- ''खेडेगाव तेथील जीवनपद्धती तेथील रिती, शेती, तेथील निसर्गाशी मातीशी असलेले मानवीपण, प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला काही प्रादेशिक वैशिष्ट्ये मानवी जीवनाला या प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक व यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या ज्या साहित्यात येतात, त्याला ग्रामीण साहित्य किंवा ग्रामीण कादंबरी म्हणतात.''[११]

**२. नागनाथ कोत्तापल्ले** :- ''ग्रामीण जीवनातून फुलणारे, आणि ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य म्हणजे ग्रामीण कादंबरी होय.''[१२]

**३. रवींद्र ठाकूर** - ''आपल्या भोवतालच्या जीवनातूनच काही घटक वेचून कादंबरी आकार घेते. तिचे उद्दिष्ट केवळ जीवन चित्रणापुरते मर्यादित नसते. तर आत्मशोध आणि जीवनशोध या प्रेरणा तिच्या ठाई प्रबळ असतात. विस्तृत चित्र फलकामुळे विविधांगी जीवन प्रवाहाचे दर्शन कादंबरीत सहजपणे अवतरु शकते. कादंबरी ही व्यक्तिविशिष्ट अनुभवाची विशिष्ट कालावकाशात गुंफलेली परंतु स्थल-कालातील वैश्विक जीवन सत्ये आणि आविष्कृत करणारी भाषिक रचना असते.''[१३]

ग्रामीण कादंबरी म्हणजे कथासूत्र, तिच्या कथा बीजात अंतर्भूत नसलेल्या बाह्य घटकांशी तडजोड करीत किंवा निवेदकाच्या मर्जीप्रमाणे हवी तशी वळणे घेऊन जन्म घेऊ शकत नाही. कादंबरीच्या कथाबीजाची निश्चिती झाल्यावर विशिष्ट तत्त्वानुसार त्याचा विकास होत असतो. घटना, प्रसंग, व्यक्ती हे घटक परस्परांशी अतूट असा संबंध प्रस्थापित करूनच कथासूत्राला पुढे-पुढे खेचीत असतात.

ग्रामीण कादंबरी म्हणजे अज्ञान रूढिप्रियता मागासलेपण असे नाही कारण या सर्व गोष्टी शहरी जीवनातसुद्धा सापडू शकतात. ग्रामीण परंपरेतील लेखकांनी कादंबरीच्या विविध रूपात बदल घडवून आणला आहे. समाजातील विविध अंगांच्या चित्रणांबरोबर ग्रामीणत्वाचे विशेषही दिसून येतात. तेथील निसर्ग, वातावरण, प्राणी, एकमेकांबद्दल असणारा जिव्हाळा आणि आपलेपणाची भावना यांचा ऊहापोह ग्रामीण कादंबरीत विशेषत्वाने केलेला आपणास आढळून येतो.

## १.६ ग्रामीण- नागर भेद :-

ग्रामीण जीवन हे संस्कृती प्रधान असते. संस्कृतीमध्ये धर्मतत्त्वे आचार, आहार, पोशाख, रूढी, प्रथा, समजुती आणि परंपरा या गोष्टी परस्पर सहकार्याने सांभाळल्या जातात. विशिष्ट मानवी समुहाची जीवन शैली जगण्याची रीती, विवाह संस्था, जाती संस्था, सामाजिक कायदे-कानून यांच्याशी निगडित असते. ही सर्व संकल्पना शहरी भागात पाळली जात नाही. ग्रामीण आणि शहरी अशा दोन पर्यावरणात भौगोलिक दृष्टीने ते विभागले जाते तेव्हा न कळत त्या दोहोंतही संस्कृती भिन्नता आढळून येते. ग्रामीण म्हणत असताना संस्कृती भिन्नता नजरेआड करता येणार नाही.

ग्रामीण जीवन कृषि केंद्री, स्थितीशील आणि पारंपरिक वळणाचे असते. ग्रामीण जीवनात विशिष्ट संस्कृती असते. अशा संस्कृतीचे संक्रमण ग्रामीण साहित्यातून होत असते. ग्रामीण संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी ग्रामीण साहित्याची पर्यायाने ग्रामीण कादंबरीची आवश्यकता असते. त्यातूनच संस्कृतीचा संस्कार आणि संक्रमण होते.

शहरी वातावरण औद्योगिकता, आधुनिकीकरण , कृत्रिम जीवन जगण्याची ओढ. यापोटी या जीवनाला एक गती प्राप्त झालेली असते. वाढत्या गरजा व त्यांच्या पुर्ततेसाठी तयार झालेली व्यापारी वृत्ती, जीवनातील कृत्रिमता ही काही शहरी संस्कृतीची चिन्हे म्हणून सांगता येतील. शहरात राहणाऱ्या व्यक्तीची मनोवृत्ती भोवतालच्या पर्यावरणाने प्रदुषित बनत जाते. एकाच कुटुंबातील दोन भाऊ असतील त्यातील एक शहरात गेला आणि दुसरा खेड्यात राहिला तर दोघांच्या वृत्तीमध्ये बदल झालेला पहावयास मिळतो. नागर संस्कृतीने माणूस आत्मकेंद्री, दिखाऊ, थोडासा मतलबी वृत्तीचा बनलेला असतो. ग्रामीण भाषेत तो थोडा स्वार्थी बनलेला असतो.

लोकसंख्येच्या घनतेच्या आधारावर ग्रामीण व नागर भेद करता येतो. ग्रामीण समाज हा कमी लोकसंख्येची घनता असलेला प्रदेश. मात्र शहरामध्ये लोकसंख्येची घनता तुलनेने जास्त असते. पुण्या-मुंबईसारख्या शहरांमध्ये आणि त्यांच्या उपनगरामध्ये राहणारे लोक नागर होत. तर सांगली, सातारा या

भागामध्ये राहणारे लोक ग्रामीण म्हणून ओळखता येतील. भारतातील एकूण लोकसंख्येच्या ३/४ जनता खेड्यात राहते. खेड्यांचे स्वरूप साचेबंध व पारंपरिक असते.

ग्रामीण जीवन हे शहरी जीवनापेक्षा सर्वस्वी वेगळे असते. ग्रामीण व शहरी कादंबऱ्यांमध्ये विशिष्ट भेद असतो. ग्रामीण साहित्य हे शहरी जीवनापेक्षा निश्चित वेगळे आहे. 'ग्रामीण' हे साहित्याचे वर्णनात्मक विशेषण आहे. ते फक्त वर्णनात्मक विशेषण नाही तर साहित्यांतर्गत अभिव्यक्त झालेल्या मानवी संस्कृतीचाही निर्देश करते. ग्रामीण साहित्य म्हणजे ग्राम संस्कृतीतून निपजलेले गावाकडे म्हणून जे जीवन त्याचे चित्रण करणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य म्हणावे लागेल.

## १.७ ग्रामीण कादंबरीची परंपरा :-

मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून 'बळीबा पाटील' या कादंबरीचा उल्लेख केला जातो. कृष्णराव भालेकर यांनी ही कादंबरी एप्रिल १८८८ ते जुलै १८८८ या कालावधीत 'दीन मित्र' दैनिकातून प्रकाशित झाली. परंतु या कादंबरीचा उत्पत्तीकाळ १८७७ आहे. कारण तिचे शीर्षक 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' असे होते. तिची निर्मिती खेड्यातील लोकांसाठी केलेली आहे. ती एकूण चार विभागात विभागली आहे. पहिल्या विभागात खेड्यातील जीवनाचे वर्णन, दुसऱ्या विभागात त्याच्या कुटुंबियांचे वर्णन, तिसऱ्या विभागात भाईबंदाची सभा तर चौथ्या विभागात जीवन सार्थकी लावण्यासाठी उपदेश केला आहे.

त्यानंतर म्हणजे १८८७ साली म. फुले यांची 'शेतकऱ्यांचा असूड' समकालीन सामाजिक परिस्थितीचे सजग भान वागविणाऱ्या विचारवंत लेखकांची निर्मिती आहे. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने पहाता त्या काळी जे काही कथात्मक स्वरूपात लेखन झाले त्यामागे म. फुले यांच्या 'शेतकऱ्यांच्या असूड' यासारख्या निबंधाची प्रेरणा होती.

त्यानंतर हरिभाऊ आपटे यांनी लिहिलेल्या 'काळ तर मोठा कठीण आला' ह्या दीर्घ कथेचा किंवा लघु कादंबरीचा उल्लेख करावा लागतो. तिच्यामध्ये ग्रामीणतेच्या स्वरुपाची आणखी एक खूण आढळते. या कादंबरीत राम धायगुडे या शेतकऱ्याच्या कुटुंबाची वाताहत हृदयद्रावक आहे. ती वाचकांचे अंत:करण पिळवटून टाकते.

र. वा. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांची 'वाईकर भटजी' १८९८ आणि पिराजी पाटील १९०३ या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. 'वाईकर भटजी' या कादंबरीला आनंद यादव यांनी पहिल्या ग्रामीण कादंबरीचा मान दिला आहे. शेतकरी जीवन आणि त्यांच्याबद्दलची माणूसकी जागृत केली आहे. पिराजी पाटील हा आपली कर्मकहाणी लेखकास सांगत आहे, असा सत्यभास निर्माण केला आहे.

जहाल मतवादी नेते लो. टिळकांच्या मृत्युनंतर भारतीय राजकारण गांधीजींच्या मवाळ धोरणाने चालू लागले. म. गांधींनी दिलेल्या 'खेड्याकडे चला' आणि 'खरा भारत खेड्यातच आहे' या विचाराने ग्राम उन्नती होऊन विविध उद्योगधंदे खेड्यात निघाले. ग्राम सफाई, ग्रामीण शिक्षण, अस्पृश्यता, सुत कताई, असे उपक्रम राबविले जाऊ लागले. याचे फलित पुढे १९२० नंतरच्या कालखंडात पहावयास मिळते.

ना. वि. कुलकर्णी यांनी कामगार जीवनाच वेध घेण्यासाठी 'मजूर' ही कादंबरी लिहिली तर ग्रामीण जीवनाचा वेध घेण्यासाठी 'कसे दिवस जातील' १९२५ ही कादंबरी लिहिली. 'शिपाई' १९२५, 'माणिक' १९३१ या ही कादंबऱ्या लिहिल्या. याच कालखंडात प्रामुख्याने प्र. ह. खाडीलकर यांनी 'स्वाधीन संसार' ही खेड्यांचा उद्धार करणारी कांदबरी लिहिली. (१९२७) रा. शा. पाटील यांची 'सीता' ही ग्रामोद्धारावर आधारित आहे. (१९३१) भा. वि. वरेकर यांची 'सात लाखात एक' ही कादंबरी खेड्यातील अंधश्रद्धेवर आधारित आहे. (१९३०) ग. रा. वाळिंबे उर्फ रामतनय यांची 'मोहित्यांची मंजुळा' ही सत्याशोधक चळवळीच्या प्रभावाने लिहिली.

वि. वा. हडप यांची 'अन्नदाता उपाशी' ही शेतकरी जीवनावर आणि वर्गीय संघर्षावर आधारित कादंबरी लिहिली. ''ग्रामीण वास्तवाची स्थूल अशी पण खरी झलक हडप दाखवतात.''[१४] असे चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात. साने गुरुजी हे म. गांधींच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित होते. त्यांनी लहान मुलांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी 'श्यामची आई' आणि 'रामाचा शेला' ह्या कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या लेखनाविषयी कुसुमावती देशपांडे संभ्रमातून बोलतात, '' 'पां. स. साने' यांची रचना विपुल आहे. त्यांनी लहान मुलांसाठी 'गोड गोष्टी' लिहिल्या. मोठमोठ्या परकीय कादंबऱ्यांची सुटसुटीत व सुबोध रूपांतरे केली. बरीच स्वतंत्र रचनाही केली. परंतु या रचनांपैकी किती भाग उपदेश प्रधान बाल वाङ्मयात जमा धरावा व किती कादंबरी प्रकारात समाविष्ट व्हावा हा प्रश्न उरतो.''[१५]

र. वा. दिघे यांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण डिसेंबर १९३९ साली 'पाणकळा' ही कादंबरी लिहिली. त्यानंतर त्यांनी 'सराई', 'आई शेतात आहे', 'पड रे पाण्या', 'कार्तिकी' या कादंबऱ्या लिहिल्या. त्यांना समीक्षक प्रादेशिक कादंबरीकार म्हणत म्हणून वाईट वाटे. मराठी साहित्याला 'ही नव्या सोन्याची खाण मिळाली' होती. त्यामुळेच ग्रामणी कादंबरी ग्रामीणता ओलांडून प्रादेशिकतेच्या टप्प्यात पोहचली. त्यानंतर ग. ल. ठोकळ यांची 'गावगुंड' ही कादंबरी प्रकाशित झाली. 'गावगुंड' मध्ये थोडे रांगडे तर थोडे पांढरपेशी वर्णन आलेले आहे.

याच काळात म. भा. भोसले यांच्या 'समरांगण' (१९४१), 'उघड्या जगात' (१९४६) या प्रकाशित झाल्या. बी. रघुनाथ यांची 'बाबु दडक' (१९४४), बा. सी. मर्ढेकर 'तांबडी माती' (१९४३), 'पाणी' (१९४८), द. र. कवठेकर यांची 'रेशमाच्या गाठी' (१९४२), वि. द. चिरंदकरांची 'महापूर' (१९४२) साली प्रसिद्ध झाली.

१९५० च्या सुमारात मधू मंगेश कर्णिक यांची 'वाडगीण' (१९५१) ही कादंबरी प्रकाशित झाली. विभावरी शिरूरकर यांनी मांग गारुडी समाजाच्या सुख-दुःखावर आधारित 'बळी' (१९५०), 'हिंदोळ्यावर' (१९५०), 'विरलेले स्वप्न' (१९५५) यातून स्त्रियांची व्यथा वेदना स्पष्ट केली. याच काळात श्री. ना. पेंडसे यांनी 'एल्गार' (१९४९), 'हद्दपार' (१९५०), 'गारंबीचा बापू' (१९५२), 'हत्या' (१९५४), 'कलंदर' (१९५९), 'रथचक्र' (१९६२) या कादंबऱ्या लिहून ग्रामीण कादंबरीचा परमोच्च बिंदू गाठला.

पेंडसे यांच्या समकालामध्ये गो. नि. दांडेकर यांनी 'शितू'(१९५३), 'पवनाकाठचा धोंडी' (१९५५), 'पडघवली' (१९५५), 'माचीवाला बुधा' (१९५८), 'जैत रे जैत' (१९६५), 'वाघरु' (१९७९) या कादंबऱ्या लिहिल्या.

व्यंकटेश माडगूळकरांनी 'बनगरवाडी' ही कादंबरी लिहिली. ज्या कादंबरीने प्रादेशिक साहित्याचा मानदंड निर्माण केला. याशिवाय माडगूळकरांनी 'वावटळ' (१९६४), 'कोवळे दिवस' (१९७९), 'करुणाष्टक' (१९८२) या कादंबऱ्या लिहिल्या. अण्णा भाऊ साठे ज्यांना साहित्यातील 'वारणेचा वाघ' म्हणून संबोधले जाते. त्यांच्या 'चित्रा' १९५१, 'वैजयंता' व 'फकीरा'१९५९, 'माकडीचा माळ'१९६४, 'रानगंगा'१९६५, 'पाझर' १९६५, 'मास्तर'१९६६, 'वारणेचा वाघ' १९६८ या श्रेष्ठ कलाकृती तयार केल्या.

हमीद दलवाई यांनी 'इंधन' १९६५, जयवंत दळवी 'चक्र', उध्दव शेळके 'धग' १९६०, 'डाळिंबाचे दाणे' १९७७ या कादंबऱ्या लिहिल्या. त्यानंतर शंकर पाटील यांची ग्रामीण सत्ता संघर्षावर आधारित 'टारफूला' (१९६४) लिहिली. रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' (१९७१), आनंद यादव यांची 'गोतावळा', महादेव मोरे 'एकोणिसावी जात' (१९६८), 'पाणोनी' (१९६९), 'रैत' (१९७१), 'बळी' (१९७२), द. ता. भोसले 'मी आणि माझा बाप' (१९६९), लक्ष्मीकांत तांबोळी यांची 'दुर गेलेले घर' (१९७०), सुभाष भेंडे यांची 'जोगीण' (१९७४), ग. दि. माडगुळकरांची 'उभे धागे आडवे धागे' (१९७२), दि. वि. जोशी यांची 'जागवेल' (१९६२), शंकरराव खरात यांची 'गावचा टिनोपाल गुरुजी' ह्या लिहिल्या.

श्रीपाद जोशी यांची 'मी भूमिपुत्र' (१९६६), 'पालापाचोळा' (१९७५) तर केशव मेश्राम यांच्या 'हकिकत' व 'जटायू' मध्ये अस्पृश्य समाजातील दैन्यावस्थेचे वर्णन केले आहे. देवदत्त पाटील 'संघर्ष' (१९७९), 'फेरा' (१९७९), 'व्यंग' (१९८०), 'सिद्धनाग' (१९८०) या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. आनंद पाटील हे १९७५ नंतरचे कथाकार म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी 'सावली' (१९८६) आणि 'कागुद' या दोन कादंबऱ्या लिहिल्या. पुरुषोत्तम बोरकर यांनी 'मेड इन इंडिया' (१९८७) साली लिहिली.

अशोक व्हटकर यांनी धार्मिक परंपरेवर आधारित 'मेलेलं पाणी' ही ढोर समाजावरची कादंबरी लिहिली. नागनाथ कोत्तापल्ले यांनी दलित वस्ती जळीत प्रकरणावर 'उलटा चालिला प्रवाही' (१९८५) आणि 'गांधारीचे डोळे' (१९८५) या देवदासींच्या जीवनावर कादंबऱ्या लिहिल्या. रंगनाथ पठारे यांनी 'पाचर' मध्ये (१९८९) मध्ये ग्रामीण मानसिकतेचे दर्शन घडविले. विश्वास पाटील यांच्या 'आंबी' (१९८०) एका दुर्दैवी मुलीची कथा आहे. बंकट पाटील यांनी तमाशात नाचणाऱ्या स्त्रियांवर 'मंधान' (१९८०) ही कादंबरी लिहिली. अरुण साधू यांनी दुष्काळाने वाताहत झालेल्या शेतकऱ्याची 'शापित' (१९८०) ही कादंबरी लिहिली.

ह. मो. मराठे यांनी 'देवाची घंटा' (१९८०) यातून दारिद्र्यातील मनाचा शोध घेतला. रंगनाथ पठारे यांनी 'हारण' (१९९०) धनगर समाजावर कादंबरी लिहिली. रवींद्र शोभणे 'प्रवाह' (१९८३), 'रक्तध्रुव' (१९८९) या कादंबऱ्या लिहिल्या. मधुकर वाकोडे यांची 'झेलझपाट' आदिवासी जीवनावर आहे. नंतर 'शिलापशेरा' (१९९९) ही कादंबरी लिहिली.

विश्वास पाटील यांनी 'झाडाझडती' आणि 'पांगिरा' (१९९०) लिहिल्या. 'महानायक' (१९९८) ही सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावर लिहिली. आनंद यादव यांनी 'नांगरणी' (१९९०) ही कादंबरी लिहिली. उद्धव शेळके यांनी 'मन:पूत' (१९९०) साली लिहिली. मोहन पाटील यांनी 'लिगाड' आणि 'खांदेपालट' (१९९०), 'बस्तान' (१९९७) या कादंबऱ्या लिहिल्या.

शंकरराव खरात यांनी 'बऱ्याची दिंडी' (१९९०) साली लिहिली. सुहास साळुंखे यांनी 'कैफ' (१९९१) साली लिहिली. तर माणदेशातील उत्तम बंडू तुपे यांनी 'इजाळ' (१९८४), 'खाई' (१९८८), 'चिपाड' (१९८९), 'भस्म' आणि 'खुळी' या कादंबऱ्या लिहिल्या.

रविंद्र शोभणे यांनी 'कोंडी' आणि 'चिरेबंद' १९९१ व १९९५ साली लिहिल्या तर 'उत्तरायण' ही २००१ साली लिहिली. आशा कर्दळे यांनी 'अपवाद' १९९३ आणि 'विदेश' १९९८ या कादंबऱ्या

लिहिल्या. नयनतारा देसाई यांनी 'पराक्रमाची शर्त झाली' १९९३ साली तर 'हेची फळ आम्हाला' १९९४ ला लिहिली. रंगनाथ पठारे यांनी 'टोकदार सावलीचे वर्तमान' १९९१, ताम्रपट' १९९४, 'दुःखाचे श्वापद' १९९५, 'नामु एकचे स्वागत' १९९९ या कादंबऱ्या लिहिल्या. दिलीप बाबु साळे यांनी 'पालख' १९९५ साली लिहिली.

चंद्रकांत खोत यांनी 'बिंब प्रतिबिंब' १९९६ साली, 'सोप्याची सावली' १९९७ ह्या कादंबऱ्या लिहिल्या. श्याम मनोहर यांनी 'खुप लोक आहेत' २००२ तर 'कळ' १९९६ साली लिहिली. जयंत नारळीकर यांनी 'व्हायरस' १९९६ तर 'अभयारण्य' २००२, राजन गवस यांनी 'धिंगाणा' १९९३, 'कळप' १९९५, 'तनकट' १९९८ या कादंबऱ्या लिहिल्या. रवींद्र ठाकुर यांनी 'उद्या पुन्हा हाच खेळ' १९९९, 'महात्मा' १९९९, 'धर्मयुद्ध' २००३ या कादंबऱ्या लिहिल्या. अरुण साधू यांनी 'मुखवटा' १९९९ ही कादंबरी लिहिली तर नामदेव कांबळे यांनी 'उनसावली' १९९७, 'राघववेल' १९९३, 'राजरंग' (१९९७) या कादंबऱ्या लिहिल्या. सुमन पाटील यांनी 'साऊ आजी' १९९८ साली लिहिली.

राजन खान या अलिकडच्या प्रतिभावान लेखकाने 'शरियत' १९९१, 'हयात आणि मजार' १९९५, 'सत ना गत' १९९९, 'चिमुटभर रूढी बाज अभाळ' १९९९, 'जातवन विनशन' २००३ या कादंबऱ्या लिहिल्या. विठ्ठल वाघ यांनी 'डेबू' १९९९ साली लिहिली. लक्ष्मण गायकवावड यांनी 'वडार वेदना' २००० लिहिली तर शिवाजी सावंत यांनी 'युगंधर' २०००, 'पुरुषोत्तम नामा' २००२ साली लिहिल्या. भालचंद्र नेमाडे यांनी 'हूल' २००० ला लिहिली. सुखदेव ढाणके यांनी 'येडा' २००१ ही कादंबरी लिहिली. माधव कोंडविलकर यांनी 'आता उजाडेल' ही २००१ ला कादंबरी लिहिली. निरंजन घाटे यांनी 'ऑपरेशन' २००१ ही कादंबरी लिहिली. विजय तेंडूलकर यांनी 'कादंबरी एक' १९९६ तर 'कादंबरी दोन' २००२ या कादंबऱ्या लिहिल्या. माधवी देसाई यांनी 'हरविलेल्या वाटा' २००२ ही कादंबरी लिहिली. बाबुराव मुळे यांनी 'वारूळ' २००४, 'पाटीलकी' २००५ साली लिहिल्या. त्यानंतर मानदेशातील लेखक सीताराम सावंत यांनी 'नामदार' २००४ आणि 'लगीन' २००५ या कादंबऱ्या लिहिल्या.

## १.८ प्रादेशिक कादंबरी संकल्पना :-

मराठी ग्रामीण कादंबरीचा विचार करताना प्रादेशिक या संकल्पनेचा विचार करणे क्रमप्राप्तच ठरते. प्रादेशिक ही संज्ञा म्हणजे ज्या कादंबरीमध्ये प्रादेशिकतेचे चित्रण असते अशा कादंबऱ्या होय. ज्या सामाजिक सांस्कृतिक वैशिष्ट्यपूर्ण पर्यावरणामध्ये कादंबरीचे कथानक घडत आणि उलघडत जाते. त्या कथानकाला त्या प्रदेशातील विशिष्ट निसर्ग वातावरण जीवनप्रणाली सर्वांशी ही कादंबरी एकजीव झालेली पहावयास मिळते.

प्रादेशिक कादंबरीमध्ये सामाजिकता चित्रित झालेली असते. ही सामाजिकता प्रादेशिक ग्रामकथावस्तूच असते. या ग्रामकथेचा श्रमिक संस्कृतीशी क्षेत्रीय जीवनाशी संबंध असतो. उपेक्षित राहिलेल्या अबाल जीवनाचे, लोकसंस्कृतीचे, कृषिसंस्कृतीचे, प्राणिसंस्कृतीचे प्रस्तुतीकरण करण्याचे कार्य प्रादेशिक कादंबरी करीत असते.

'प्रादेशिक' हा शब्द प्रथम वि. स. सुखठणकरांनी वापरला. त्यामध्ये सहहेतुकता होती. त्यांनी लिहिलेल्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या कथासंग्रहावर 'आठ प्रादेशिक कथा' असे शीर्षक छापले होते. त्यात गोमंतकातील जीवनाचे वैशिष्ट्यपूर्ण चित्रण होते. व्यंकटेश माडगुळकरांनी लिहिलेल्या 'बनगरवाडी' कादंबरीमुळे प्रादेशिक हा शब्द पुन्हा पुढे आला. विशिष्ट प्रदेशाचे चित्रण होऊ लागले. 'प्रादेशिक' ही संज्ञा ग्रामीणपेक्षा व्यापक झाली. प्रादेशिकतेमध्ये संपूर्ण ग्राम जीवनाचे वर्णन असते. तर ग्रामीणमध्ये फक्त व्यक्तिगत वर्णन पहावयास मिळते.

शहरे प्रादेशिकतेपासून दुर ठेवावीत. ग्रामीण पारंपरिक वैशिष्ट्यापासून शहरे दुरावलेली असतात. भौगोलिकदृष्ट्या शहरांचा अंतर्भाव प्रादेशिकतेत होत असला तरी त्यास प्रादेशिक साहित्यापासून दूर ठेवणे अभिप्रेत आहे. त्याचप्रमाणे शहरी झोपडपट्ट्यांचे जीवनचित्रण प्रादेशिकतेत येऊ शकत नाही. कारण शहरी संस्कृतीमुळे भांडवलशाही, कारखानदारी यांनी निर्माण झालेले दारिद्रय म्हणजे झोपडपट्ट्यांचे बकाल जीवन होय. ''महाराष्ट्रीय म्हणून आपली कादंबरी रीतीरिवाज देव-देवता एक असतात. मराठी माणसाची विशिष्ट गोष्टींच्या बाबतीत विशिष्ट प्रक्रिया होत असते. त्यामुळे आपल्या नागर वा ग्रामीण जीवनात बऱ्याच गोष्टी समान असल्यासारख्या दिसतात.''[१६]

प्रादेशिक आणि ग्रामीण या दोन्ही संज्ञा वेगळा अर्थ सुचवितात. परंतु त्यांच्याकडील वेगळेपणाचे भान राखले जात नाही. 'प्रादेशिक' ही संज्ञा 'ग्रामीण' पेक्षा व्यापक आहे.

**१. मदन कुलकर्णी** :- 'विशिष्ट भू-प्रदेशाचे अथवा ग्रामाचे तेथे वास्तव्य करणाऱ्या लोकजीवनाचे भूगोल व निसर्ग यांसह सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे सामुहिक रूपाने चित्रण करणारी, तेथील लोकसमाजाच्या समस्या, चालीरीती, रुढी, परंपरा, सणवार व उत्सव, जत्रा-मेळे, अंधश्रद्धा, भूतप्रेताविषयक संकल्पना, देवदेवस्की आणि अन्य लोकतत्वे इत्यादींचे तसेच नवजागृतीचे, स्थानिक बोलीभाषेद्वारे अथवा प्रमाण भाषेद्वारे सामंजस्याने वास्तवपूर्ण चित्रण करणाऱ्या कादंबरीला प्रादेशिक कादंबरी म्हणता येईल.''[१७ अ]

**२. भास्कर शेळके** :- ''प्रादेशिक साहित्य म्हणजे प्रदेशाचे चैतन्यरुप आणि त्या प्रदेशातून साकार झालेल्या समाजमनाचे चैतन्य जिथे एकात्म स्वरूपात व्यक्त झालेले आहे ते साहित्य.''[१८ ब] एखाद्या

समाजातील समान घटक असलेला भौगोलिक पट्टा म्हणजे प्रादेशिक साहित्य होय. थोडक्यात प्रादेशिक वाङ्मय म्हणजे ग्रामविभागाचे समुहदर्शन तर ग्रामीण म्हणजे व्यक्तिनिष्ट जीवनदर्शी असे वर्णन मदन कुलकर्णी करतात.

३. **रवींद्र ठाकूर** :- "प्रादेशिक म्हणजे विशिष्ट भौगोलिक परिसीमांनी नियत झालेल्या परिसराची अनेकांगांनी युक्त अशी अनन्यसाधारण विशेषता होय. ही विशेषता येथील लोकजीवनात काही तत्त्वाच्या रुपाने अस्तित्वावत असते. अशा प्रदेशाचे जीवन जेव्हा एखाद्या साहित्यकृतीत साक्षात होत असेल तेव्हा प्रदेश-व्यक्ती, प्रदेश-व्यक्तिसमूह असे संबंध चित्रित होतील किंवा फक्त प्रदेश हा ही साहित्यकृतीचा विषय असू शकेल. तिच्यातील प्रादेशिकता केवळ समुह जीवन चित्रणातच निहीत असेल असे नाही."[१९] अशा प्रकारची व्याख्या रवींद्र ठाकूर करतात.

४. **प्रल्हाद वडेर** :- "विशिष्ट प्रदेशातील जीवनाचे चित्रण करणारे वाङ्मय म्हणजे प्रादेशिक असे न म्हणता एखाद्या विशिष्ट भू-प्रदेशातील निसर्ग आणि मानव यांचे सामुदायिक चित्रण करणारे वाङ्मय म्हणजे प्रादेशिक वाङ्मय होय."[२०]

५. **नागनाथ कोत्तापल्ले** :- "प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला, ग्रामसंस्कृतीला फारसे महत्त्व देत नाही. तर ते महत्त्व देते. एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला कधी ग्रामजीवन आलेच तर ते स्वतंत्रपणे येत नाही. ते येते या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा एक भाग म्हणून येथे ग्राम संस्कृतीपेक्षा त्या प्रदेशाचा टापू अधिक महत्त्वाचा असतो. त्या दृष्टीने प्रादेशिक साहित्यातून व्यक्तिकेंद्रितता दिसत नाही, तर समुहकेंद्रितता हे त्या साहित्याचे वैशिष्ट्य असते."[२१]

६. **आनंद यादव** :- "एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, जीवनसंकेत, रीती, समुहजीवनातील भावभावना आणि या सर्वातून निर्माण झालेल्या समस्या आणि जीवननाट्य यांचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने ज्या कादंबऱ्या लिहिल्या जातात त्यांना प्रादेशिक कादंबऱ्या म्हणता येईल."[२२]

आनंद यादव यांनी वरील ग्रामीण कादंबरीची व्याख्या केलेली आहे.

प्राचीन भारतीय व्यवस्थेमुळे विशिष्ट प्रदेशातील लोकसमुहाची वेगळी अशी संस्कृती टिकून असते. बोलीभाषेला वेगळाच रुपरंग असतो. चालण्यात, बोलण्यात, फिरण्यात, वागण्यात विशिष्ट लकबी असतात. त्यांच्यात प्रत्येकाबद्दल आपलेपणाची भावना असते. त्यांच्या चाली, रीतीरिवाज, धार्मिक रूढी, परंपरा, विविध विधी, देवदेवता, संस्कृती यांना ते चिकटलेले असतात. तर त्यांचा

पेहराव, सण, उत्सव, लोकवाङ्मय, खाणे-पिणे, जन्म, विवाह, मृत्यू हे इतर प्रदेशातील लोकांपेक्षा वेगळे असते. त्यांच्यात संयुक्त कुटुंबपद्धती, बिकट आर्थिक स्थिती, करमणूकीच्या साधनांचा अभाव, निसर्गाशी केवळ 'जीवनभोग' म्हणून एकजीव होणे. यातून त्यांच्यातली प्रादेशिकता दुर्लक्षली जाऊ नये. विशिष्ट प्रदेश त्याच्या रूपरंगासह साक्षात करणे हेच प्रादेशिक कादंबरीकाराचे लक्ष असते.

## १.८.१ प्रादेशिक कादंबरीतील वास्तवता :-

प्रादेशिक कादंबरीतील वास्तवता कलात्मक असते. घडलेल्या घटनांचे जसेच्या तसे वर्णन करणे म्हणजे वास्तवता होय. व्यक्ती घटना - प्रसंग आणि वातावरणादी घटक एकूण कलाकृतीत सुसंगतपणे एकात्म झाले पाहिजेत. आणि ते वाचकांच्या जाणिवेच्या पातळीवर प्रत्ययक्षम झाले पाहिजेत. सर्व घटक कादंबरीचा एकात्म भाग बनले पाहिजेत. वास्तवतेचा निकष व्यावहारिक वास्तवतेच्या अनुषंगाने सिद्ध होत नसतो. कलांतर्गत वास्तवाच्या कसोट्या वास्तवाहून वेगळ्या असतात. वास्तवता म्हणजे कलाकृतीतील विविध घटकांचा सच्चा आणि स्वाभाविक मेळ असे म्हणता येईल.

'बनगरवाडी' या कादंबरीतील वास्तवाविषयी रवींद्र ठाकूर म्हणतात, ''माडगूळकरांची 'बनगरवाडी' माणदेशातील आहे, असे म्हणता आले तरी ती माणदेशात अगदी प्रत्यक्षात अस्तित्वात असेलच असे म्हणता येणार नाही. वास्तवाचा उपयोग करून माडगूळकरांनी निर्मिलेले ते स्वतंत्र विश्व आहे. बनगरवाडी प्रत्यक्षातली नसते. परंतु प्रत्यक्षाशी नाते सांगते हीच तिची प्रादेशिकता होय.''[२३]

अशाप्रकारे कादंबरीची प्रादेशिकता व ग्रामीणता यामध्ये भेद आहे. प्रादेशिकता ही ग्रामीणतेपेक्षा अधिक व्यापक आहे. प्रादेशिक कादंबरीतील वास्तव आणि प्रत्यक्ष अनुभवातील वास्तव यामध्ये फरक असतो.

## १.९ प्रादेशिक साहित्याचे विशेष :-

साहित्याची सर्व अंगे कादंबरीने पचविलेले असल्यामुळे जीवनाची सर्व अंगे व्यापून टाकण्याची तिची क्षमता आहे. प्रादेशिकतेची ही प्रवृत्ती मराठी मातीशी आणि मराठी मनाशी नाते सांगणारी असल्यामुळे इतर प्रवृत्तीच्या तुलनेत प्रादेशिक प्रवृत्तीचा प्रवाह मराठी साहित्यात लोकप्रिय झालेला दिसतो. प्रादेशिक कादंबरीचे विशेष पुढील प्रमाणे मांडता येतील.

**१.९.१ भौगोलिकता :-** प्रादेशिकतेत सर्वप्रथम जाणवणारी गोष्ट म्हणजे भौगोलिकता होय. म्हणजेच विशिष्ट भू भागाचे चित्रण हा साहित्याचा महत्त्वाचा गुणधर्म आहे. भू भागाची व तेथील जीवनाची वैशिष्ट्ये म्हणजे प्रादेशिकता होय. यंत्रयुगापासून आणि सोयीसमृद्धीपासून अत्यंत दूर आणि अडवळणी

असतो. व्यवहारातील भौगोलिक प्रदेश वेगळा आणि साहित्यातील भौगोलिकता म्हणजे सामाजिक आणि सांस्कृतिक धाग्यांनी विणलेला प्रदेश होय. तेथील लोकांच्या मनात त्या भूभागाविषयी जवळीक, प्रेम, आपुलकी निर्माण होते. त्या प्रदेशातील जीवन त्या साहित्यात चित्रित झालेले असते.

**१.९.२ समुहजीवन प्रणाली :-** ग्रामीण कादंबरीशी तुलना करता ज्या कादंबऱ्यामध्ये पात्रांची संख्या खूप असते. माणूस हा ग्रामीण समाजाचा घटक म्हणून तो समाजाशी अधिक बांधलेला असतो. संपूर्ण गाव म्हणजे जणू काही एक मोठे कुटुंबच असते. अशी ग्रामीण समाजाची रचना असते. येथील सुख किंवा दु:ख एखाद्याचे वैयक्तिक न राहता सर्व गावाचे बनते. संकटसमयी सर्व गाव एक होऊन लढतो. जन्म, विवाह, मृत्यू, सण, उत्सव हे लोक एकत्र येऊन साजरे करतात. लोककला आणि लोकवाङ्मय यांची विविधता सामुहिकतेतून लक्षात येते. त्यातून एकमेकांशी प्रेम निर्माण होऊन एकमेकांशी बांधिलकी असल्याची जाणीव प्रादेशिक साहित्यातून होते.

**१.९.३ निसर्ग :-** निसर्ग प्रादेशिक साहित्यात उठावदारपणे रेखाटलेला असतो. येथील मानव निसर्गाशी कमालीचा एकरूप झालेला असतो. प्रादेशिक कादंबरीतील निसर्गदर्शन प्रभावी असते. उघडे-बोडके डोंगर, हंगामी नद्या, खुरटी झाडे, ओढे, पडक्या विहीरी, अवेळी येणारा पाऊस, हंगामी पिके, नागमोडी पायवाटा, पाणंद, बांध, शेतमळ्यांची नांवे (सातकी, कळापट्टा) अशा निसर्गापासून येथील मानवी जीवन अलग करता येत नाही. येथे पावसावर सर्व काही अवलंबून असते. थोडासा जरी पाऊस पडला तरी लोक कमालीचे खूश होतात आणि निसर्ग बहरून येतो. या अशा प्रकारच्या निसर्गाचे चित्रण प्रादेशिक साहित्यात पहावयास मिळते.

**१.९.४ देवदेवता आणि अंधश्रद्धा :-** शहरी भागातील लोकांपेक्षा ग्रामीण भागातील लोकांमध्ये भरपूर वेळ रिकामा असतो. त्यामुळे ते लोक देव-देवता व संत यामध्ये गुंतलेले दिसतात. निसर्गाच्या आक्राळ विक्राळ रुपामुळे हे लोक भयभीत होतात. (भूकंप, दुष्काळ, अतिवृष्टी). देवाला प्रसन्न करण्यासाठी नवस बोलतात. अंधश्रद्धा, धार्मिक रूढी, परंपरा, चाली, रीतीरिवाज यांना ते चिकटलेले असतात. स्त्री शिक्षणाची अनास्था, बालविवाह, विधवा विवाहास नकार, केशवपन अशा अंधश्रद्धा समाज मनात रूजलेल्या असतात. आपली पूर्वापार चालत आलेल्या संस्कृतीला चिकटून असतात. याचे चित्रण प्रादेशिक साहित्यात असते.

**१.९.५ ग्रामजीवन दर्शन :-** ज्या कादंबरीत एखाद्या भागातील जनजीवन लोकसंस्कृतीसह दाखविले जाते त्याला प्रादेशिक साहित्य म्हणतात. निसर्गाच्या अवकृपेला सामारे जात आलेला माणूस दिवस केवळ 'जीवनभोग' म्हणून ढकलत जगत असतो. येथे एकत्र कुटुंब पद्धतीचा अवलंब फार मोठ्या

प्रमाणात पहावयास मिळतो. कुटुंबातील कुटुंबप्रमुखाचा शब्द ग्राह्य मानला जातो. गावातही गावातील मुख्य माणसाचा शब्द पाळला जातो. कोणत्याही सार्वजनिक कामात सर्व लोक एकजुटीने सहभागी होतात. विविध जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. पाटील, मराठा, कुलकर्णी, चौगला, लोहार, सुतार, कुंभार, न्हावी, परिट, गुरव, कोळी, धनगर, तांबोळी, लोणारी, तेली, साळी, माळी, गोंधळी, महार, मांग, चांभार, बेरड, रामोशी, मुस्लिम सर्वांच्या कार्यात सहभागी होऊन उच्च-नीच भेदभाव करीत नाहीत. गावात बोळवजा रस्ते, माळवणी घरे, चावडी, ग्रामपंचायत कार्यालय, देवाचे मंदिर, पाटलांचा वाडा, तालिम, गुरांचे गोठे असतात. तर गावाबाहेर शाळा, अंगणवाडी, शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्रे असतात. याचे वर्णन प्रादेशिक साहित्यात आढळते.

**१.९.६ भाषा :-** प्रादेशिक साहित्यात बोलीभाषेचा वापर फार मोठ्या प्रमाणावर केलेला पहावयास मिळतो. एखादे व्यक्तिचित्र त्याच्या बोलीभाषेत जितके उठून दिसेल तितके प्रमाण भाषेत दिसू शकणार नाही. वास्तव जीवनदर्शनासाठी बोलीभाषेचा वापर अटळ असतो. प्रादेशिक साहित्याच्या भाषेतून ग्रामीण शब्द, शिव्या, म्हणी, वाक्प्रचार, सुभाषितवजा वाक्ये यांचे दर्शन घडते. बोलीतील रांगडेपणा वाचकाला आवडतो. मोकळेपणा आणि रोकडेपणा दिसून येतो. प्रादेशिक साहित्यात ग्रामीण जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण बोलीभाषेच्या द्वाराच प्रकट होऊ शकते. निवेदन मात्र प्रमाण भाषेमध्ये असते.

**१.९.७ लोकसाहित्य :-** प्रत्येक प्रदेशात समाजात मौखिक परंपरेने चालत आलेले लोकसाहित्य असते. विविध कार्यक्रम व प्रसंगाच्या वेळी विविध गीते गायली जातात. लोकनृत्य केले जाते. देवाला आळवण्यासाठी आणि करमणूकीसाठी लोकसाहित्य सादर केले जाते. विविध लोककला, लोकगीते आणि लोककथा यांचा समावेश लोक वाङ्मयात होतो. प्रादेशिक साहित्यातून हे प्रकट होत असते.

अशाप्रकारे प्रादेशिक साहित्यामध्ये वेगवेगळ्या घटकांचा समावेश होतो. वरील सर्व घटकांचा समावेश प्रादेशिक कादंबरीत होत असतो. या विशेषावर प्रादेशिकतेची चौकट उभी आहे.

## समारोप :-

कादंबरी वाङ्मय प्रकारची सुरुवात अव्वल इंग्रजी कालखंडात १५० वर्षापूर्वी झाली. कादंबरी वाङ्मयास इंग्रजी साहित्याच्या परिचयाने सुरुवात झाली. मराठीतील पहिली कादंबरी म्हणून 'हरी केशवजी' यांची 'यांत्रिकक्रमण' ही होय. तर पहिली प्रादेशिक कादंबरी र. वा. दिघे यांची 'पाणकळा' ही ठरली. तर माणदेशी प्रादेशिकतेने नटलेले कादंबरी माडगुळकरांची 'बनगरवाडी' ही पहिली प्रादेशिक कादंबरी ठरली. कादंबरी म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या विशिष्ट इच्छा अनेक अडचणीतून आणि संकटातून मार्ग काढून कशी सिद्धीस गेली अगर तिची कशी मोडतोड झाली याची कहाणी होय. ही ना. सी. फडके

यांची व्याख्या विशेष भावते. पात्रे, घटना, प्रसंग, वातावरण, स्थलनिर्देश यांनी संसार चित्र उभी करणारी दीर्घकथा म्हणजे कादंबरी होय.

कादंबरी लिहित असताना विशिष्ट घटक डोळ्यासमोर ठेऊनच कादंबरी लेखन केले जाते. विषय, कथानक, पात्रे किंवा व्यक्तिचित्रणे, संवाद, निवेदन पद्धती, वातावरण निर्मिती, भाषाशैली, संघर्ष आणि उपकथानके हे घटक समोर असतात. तर कादंबरीच्या प्रकारामध्ये भाषांतरित कादंबरी सुरुवातीला चालू झाली. त्यानंतर ऐतिहासिक विषयावर कादंबरी लेखन झाले. राजकीय, सामाजिक, अद्‌भुतरम्य असे कादंबरीचे प्रकार आहेत.

मराठी ग्रामीण कादंबरीची संकल्पना विचारात घेऊन ग्रामीण व नागर भेद विचारात घेतला. बळीबा पाटीलपासून सुरु झालेल्या ग्रामीण कादंबरीचा आढावा २००५ पर्यंतची माणदेशातील 'लगीन' या सीताराम सावंताच्या कादंबरीपर्यंत येतो. प्रादेशिक आणि ग्रामीण यामधील भेद व प्रादेशिकतेच्या विविध व्याख्यांवरून प्रादेशिकतेची संकल्पना स्पष्ट केली आहे. त्यानंतर प्रादेशिकतेचे विशेष यामध्ये भौगोलिकता, समुहजीवन, निसर्ग, देव-देवता आणि अंधश्रद्धा, ग्राम जीवनदर्शन, भाषा आणि लोकसाहित्य हे पाहिले.

# संदर्भ सूची


१. नेमाडे, भालचंद्र : 'परिसंवाद', 'कादंबरी १९५० - १९७५', संपादक - पवार गो. मा., हातकणंगलेकर म. द., पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती - १९८६, पृ. क्र.१९.

२. बापट, प्र. वा. व गोडबोले, ना. वा. : 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे, ४११ ०३०, प्रथमावृत्ती - १९७३, पृ. क्र. ५.

३. ठाकूर, रवींद्र : 'मराठी ग्रामीण कादंबरी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती - १९९३, पृ. क्र. ४९.

४. विश्वकोश : 'मराठी विश्वकोश खंड तीन', महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ, आवृत्ती - १९७६, पृ. क्र. ५९९.

५. फडके, ना. सी. : परिसंवाद, मराठी कादंबरी वाटचाल, पुणे.

६. बांदिवडेकर, चंद्रकांत : 'मराठी कांदबरीचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथमावृत्ती - १९८९, पृ. क्र.५,६

७. बापट, प्र. वा. व गोडबोले, ना. वा. : 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे, ४११ ०३०, प्रथमावृत्ती - १९७३, पृ. क्र. ३६.

८. बांदिवडेकर, चंद्रकांत : 'मराठी कांदबरीचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथमावृत्ती - १९८९, पृ. क्र.३१

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | हस्तक उषा | : | 'मराठी कादंबरी संवाद सत्यकथा', प्रथमावृत्ती - १९६३, पृ. क्र. २६. |
| १०. | देशपांडे कुसुमावती | : | 'पासंग', मौज प्रकाशन गृह, मुंबई, चतुर्थावृत्ती १९८७, पृ. क्र. ११९, १२०. |
| ११. | यादव आनंद | : | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावत्ती १९८४, पृ. क्र.९. |
| १२. | कोत्तापल्ले नागनाथ | : | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि शोध', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८५, पृ. क्र.७. |
| १३. | ठाकूर रवींद्र | : | 'मराठी ग्रामीण कादंबरी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती -१९९३, पृ. क्र. ७. |
| १४. | बांदिवडेकर चंद्रकात | : | 'मराठी कांदबरीचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथमावृत्ती - १९८९, पृ. क्र.५७. |
| १५. | देशपांडे कुसुमावती | : | 'मराठीं कांदबरीचे पहिले शतक', मराठी साहित्य संघ, मुंबई, द्वितीयावृत्ती - १९७५, पृ. क्र.३१२. |
| १६. | भावे, शि. स. | : | 'प्रस्तावना' आनंद यादव, 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती - १९८१, पृ. क्र. ५. |

१७. कुलकर्णी, मदन : 'मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि विकास'
मंगेश प्रकाशन, नागपूर,
प्रथमावृत्ती, १९८४, पृ. क्र.

१८. शेळके, भास्कर : 'मराठी कादंबरीतील प्रादेशिकता',
स्नेहवर्धन प्रकाशन हाऊस, पुणे,
द्वितीयावृत्ती - २००४, पृ. क्र. २३.

१९. ठाकूर रवींद्र : 'मराठी ग्रामीण कादंबरी',
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
प्रथमावृत्ती - १९८३, पृ. क्र.१३.

२०. वडेर, प्रल्हाद : 'आशय आणि अविष्कार',
मेहता पब्लिशिंग हाऊस,
प्रथमावृत्ती - १९८८, पृ. क्र. २७

२१. कोत्तापल्ले, नागनाथ : 'ग्रामीण साहित्य स्वरुप आणि शोध',
मेहता पब्लिशिंग हाऊस,
प्रथमावृत्ती - १९८५, पृ.क्र.१५.

२२. यादव, आनंद : 'ग्रामीण साहित्य स्वरुप आणि समस्या',
मेहता पब्लिशिंग हाऊस,
प्रथमावृत्ती - १९८४, पृ. क्र. ७६.

२३. ठाकुर, रवींद्र : 'मराठी ग्रामीण कादंबरी',
मेहता पब्लिशिंग हाऊस,
प्रथमावृत्ती - १९९३, पृ. क्र. २२.


-----x-----